## थोडक्यात...

### आज अभियान

**विंचूर ।** विंचूर महसूल मंडळाच्या वतीने विंचूर महसूल मंडळातील शेतकरी व नागरिकांसाठी मंगळवारी (दि.१०) सकाळी ११ वाजता तलाठी कार्यालय विंचूर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान आयोजित करण्यात आले. अभियानांतर्गत विविध दाखले वाटप, फेरफार नोंदी, कजाप नोंदी, शिवरस्ते, पानंद रस्ते बाबत तसेच शेतकरी व शेतीशी निगडीत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विंचूर महसूल मंडळातील सर्व शेतकरी व नागरिकांनी उपस्थित राहून अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विंचूर मंडल अधिकारी व ग्राममहसूल अधिकारी यांनी केले आहे.

### निवडीचे स्वागत



**म्हाळसाकोरे ।** भाजप युवा नेते यतीन कदम यांची भाजप नाशिक ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल निफाड तालुक्यात स्वागत होत आहे. भाजप तालुका सरचिटणीस रामदास मुरकुटे, आध्यात्मिक वारकरी आघाडी निफाड तालुकाध्यक्ष हभप ज्ञानेश्वर इकडे, भाजप शहराध्यक्ष विलास आव्हाड, बाळासाहेब हाडपे, कैलास हाडपे आदींनी कदम यांचा म्हाळसाकोरे येथे सत्कार केला.

### मद्यसाठा सापडला



**पिंपळगाव बसवंत ।** पालखेड मिरचीचे येथील न्यू सारंग हॉटेल अँड बारमध्य अज्ञात चोरट्यांनी २४ मे रोजी दारूच्या बाटल्यांची चोरी केल्याची घटना घडली होती. यासंदर्भात पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पिंपळगाव पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही तसेच तांत्रिक बाबींच्या आधारे तपास सुरू केला होता. यातील एका आरोपीस ६ जून रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून अटक केली. त्याच्याकडून १ लाख १० हजार रुपयांच्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उर्वरित चार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत

### शाळा उघडण्याचे वेध

**निफाड ।** गत एक-दिड महिन्यापासून प्राथमिक व माध्यमिक शाळांना सुट्टी असल्याने विद्यार्थी हे घरी होते. त्यामुळे पालकांना आता १५ जूनच्या शाळा उघडण्याच्या तारखेकडे लक्ष लागले आहे.

विद्यार्थ्यांना शाळा सुरू होणार असल्याने शाळेसाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंची यादी पालकांना लिहून देण्यासाठी मुलांची तयारी सुरू झाली आहे. तालुक्यातील निफाड शहरासह ओझर, पिंपळगाव बसवंत, लासलगाव, विंचूर, चांदोरी, सायखेडा, कसबे सुकेणे, पालखेड मिरची, देवगाव अशा मोठ्या शहर व गावांमध्ये शालेय वस्तू मिळणाऱ्या दुकानात गर्दी दिसायला लागली आहे. व्यावसायिकांमध्येही या शालेय खरेदीच्या निमित्ताने उत्साह संचारला आहे. यानिमित्ताने मंदी आलेल्या बाजारपेठेत गर्दी व खरेदीने आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात होऊन यामुळे आर्थिक मंदी जावून अर्थव्यवस्थेला गती येणार आहे. शालेय व्यावसायिकांबरोबर अन्य व्यवसाय असलेले बुट, चप्पल, छत्री विक्रेत्यांनाही तेजी येणार आहे.

### येवला आगारात आढावा

**येवला ।** 'स्वच्छ व सुंदर बसस्थानक स्वच्छता अभियान २०२५' अंतर्गत मुंबईच्या मध्यवर्ती कार्यालयातील उपमहाव्यवस्थापक यामिनी जोशी यांनी येवला आगाराला भेट दिली. त्यांनी आगारातील स्वच्छता, सुविधा आणि प्रवाशांना मिळणाऱ्या सेवा यांचा आढावा घेतला.

# संत निवृत्तिनाथ महाराज पालखीचे आज प्रस्थान

**त्र्यंबकेश्वर । प्रतिनिधी**




आषाढी एकादशी यात्रेसाठी पंढरपुरकडे संत निवृत्तिनाथ महाराज पालखीचे प्रस्थान आज (दि.१०) त्र्यंबकेश्वर येथून दुपारी होणार आहे. वारीच्या प्रारंभावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे येण्याची शक्यता ट्रस्टकडून व्यक्त करण्यात आली. दिंड्या आणि वारकऱ्यांचे आगमन येथे झाले होते.

संत निवृत्तिनाथांच्या चांदीच्या रथाला झळाळी देण्यात आली आहे. तसेच, मंदिर प्रांगणात भव्य मंडप टाकण्यात आला आहे. मंदिर ट्रस्टचे विश्वस्त व्यवस्थापक व कर्मचारी हे येथे नियोजन करण्यासाठी धावपळ करताना दिसत होते. श्री संत निवृत्तिनाथ महाराज मंदिरापासून दुपारी दोन वाजता संत निवृत्तिनाथ महाराजांचा रथ पालखी निघेल. अडीच वाजता तीर्थराज कुशावर्तावर पालखीचे स्वागत त्र्यंबकेश्वर नगरपालिकेकडून करण्यात येईल. यावेळी गोदावरीचे तीर्थाचा अभिषेक संत निवृत्तिनाथांच्या प्रतिमा पादुकांना नगरपालिका मुख्याधिकारी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. पुढे संत गजानन महाराज मंदिर पर्यंत मुख्य नाक्यापर्यंत भाविक पालखीला निरोप देण्यासाठी जाणार आहे. पालखीचा पहिला मुक्काम येथील महानिर्वाण आखाड्यात गुरु गहिनीनाथांच्या समाधीस्थानी होणार आहे.

# खानगाव-थेटाळे रस्ता दुरूस्तीला मुहूर्त कधी?

**खडकमाळेगाव । वार्ताहर**

लासलगाव-येवला मतदारसंघातील विद्यमान अन्नपुरवठा नागरीमंत्री छगन भुजबळ यांच्या मतदारसंघात असलेल्या खानगाव (नजिक) ते थेटाळे या दोन गावांना जोडणाऱ्या सुमारे ५ कि.मी. अंतराच्या डांबरी रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे. या मार्गाच्या कामाला मुहूर्त कधी लागणार, असा सवाल ग्रामस्था, वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.



शेतमाल व प्रवासी वाहतुकीसाठी हा मार्ग म्हणजे 'असून अडचण नसून खोळंबा' असा हा रस्ता आहे. या रस्त्याची विनाविलंब दुरुस्ती तथा नूतनीकरण करुन प्रवासातील अडसर दूर करावा. अन्यथा, रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा खानगाव नजिक, थेटाळे, सोनेवाडी, नैताळे परिसरातील शेतकरी व नागरिकांनी दिला आहे.

रस्त्याचे गत दोन-तीन वर्षापूर्वी डांबरीकरण झाले. सदरचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने अल्पावधीतच हा रस्ता उद्धवस्त झाला. रस्त्याची कोणतीच दुरुस्ती नसल्याने सध्या या मार्गावर पावलोपावली खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. काही अंतरावर तर खडी व डांबराचे अस्तित्वच राहिले नाही. परिणामी मालवाहतूक करणाऱ्या वाहनांचा तोल जावून अपघात होत आहे. खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने पादचारी तथा शाळेतील विद्यार्थ्यांना सुरक्षित मार्ग शोधण्याची वेळ येत आहे.

खडकमाळेगाव, खानगाव येथील लासलगाव बाजार समितीच्या उपबाजार आवारात भाजीपाला, द्राक्षमणी, मिरची आदी शेतमालाची गाजरवाडी, नैताळे, सोनेवाडी, थेटाळे या गावातून मोठ्या प्रमाणात शेतमाल वाहतूक होते. उपरोक्त गावांना हा जवळचा मार्ग असल्याने या रस्त्यावर वर्षभर वाहनांची वर्दळ असते. वरील उपबाजार आवारात मिरची विक्रीसाठी निफाड तालुक्यातील दक्षिण पूर्व गावातील शेतकऱ्यांना हा मार्ग जवळचा आहे. या मार्गाची सद्या मोठी चाळण झाल्याने प्रवासात अडसर निर्माण झाला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन या डांबरी मार्गाचे रुंदीकरणाबरोबरच नूतनीकरण होणे गरजेचे आहे, अशी मागणी शेतकरी व नागरिकांनी केली आहे.

# घनकचरा प्रश्न मार्गी लावणार : आ. बनकर

**ओझर । वार्ताहर**

गत अनेक महिन्यांपासून ओझरकरांना भेडसावत असलेल्या घनकचरा प्रश्न मार्गी लावणार असल्याची ग्वाही आ. दिलीप बनकर यांनी दिली आहे.

ओझर नगर परिषदेला एचएएलच्या वतीने अग्निशामक वाहन देण्यात आले. त्याचे लोकार्पण आ.बनकर यांनी केले. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर एचएएल डिजीएम शैलेम एच.आर त्रिविक्रम, ओझर मर्चंट बँक अध्यक्ष राजेंद्र शिंदे, ओझर नगरपरिषद मुख्याधिकारी किरण देशमुख, कामगार संघटना अध्यक्ष अनिल मंडलिक, सरचिटणीस संजय कुटे, जयचंद नायर, उपमुख्य कार्यकारी स्नेहलता फडतरे उपस्थित होते.

नगर परिषद मुख्याधिकारी देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, घनकचरा संकलनसाठी एचएएल प्रशासनाने जागेसाठी सकारात्मकता दाखवावी. एचएएल डिजीएम त्रिविक्रम यांनी एचएएल प्रशासन ओझर व परिसराच्या विकासासाठी कायम कटिबद्ध असल्याची ग्वाही देत एचएएलने ओझर परिसरात केलेल्या विकासाची माहिती दिली. याप्रसंगी ओझर मर्चंट बँक उपाध्यक्ष प्रवीण लड्डा, संचालक विजय शिंदे, शरद सिन्नरकर, रऊफ पटेल, संजय सोनवणे, कॅनाल बागाईतदार संघ उपाध्यक्ष नंदकुमार कदम, भारत पगार, दिलीप कदम, डॉ.योगेश्वर चौधरी, धोंडीराम पगार, रमेश मंडलिक, गोविंद सिन्नरकर, संजय गवळी,आदी उपस्थित होते.

# स्वदेशी रासायनिक खते वापरावे
## कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

**घोटी । वार्ताहर**

कृषी विभागातर्फे शेतकऱ्यांना डीएपी खतास पर्याय म्हणून सिंगल सुपर फॉस्फेट, ट्रिपल सुपर फॉस्फेट, एनपीके आणि नॅनो लिक्विड डीएपी यासारख्या खते वापरण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अभिमन्यू काशीद, कृषी विकास अधिकारी संजय शेवाळे यांनी केले आहे.

राज्यातील अनेक भागांप्रमाणेच नाशिक सह तालुक्यातही डीएपी खताचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असून, याच्या कमतरतेमुळे अनेक वेळा शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागते. यामुळे पर्यायी खतांचा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे, असे जिल्हा कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. डीएपी खताची कमतरता भरून काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरदयुक्त खतामध्ये डीएपी खता नंतर एसएसपी सुपर फॉस्फेट या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी हे खत देशांतर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद १६ टक्के व गंधक ११ टक्के इतर सूक्ष्म अन्नद्रव्य आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामुळे तेल बिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरून डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर करून डीएपी चांगला पर्याय तयार होऊ शकतो. त्यामुळे चालू खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डीएपी खतावरच अवलंबून न राहता पारंपरिक खतांबरोबरच पर्यायी खतांचा वापर करून आधुनिक, खर्चिकदृष्ट्या किफायतशीर आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करावी, असे आवाहन काशीद यांनी केले.

# कत्तलीसाठी जाणाऱ्या गायींची सुटका

**घोटी । वार्ताहर**



सोमवारी(दि.९) पहाटे पेट्रोलिंग दरम्यान देवगाव परिसरात पोलिसांनी पिकअप वाहन (क्र. एमएच १५, ईजी, ६७५०) तपासणी केली असता त्यात चार गायींची कत्तलीच्या उद्देशाने वाहतूक केली जात असल्याचे उघड झाले.

वाहन तपासणीदरम्यान पोलिसांना गायींच्या तोंडाला आणि पायाला दोरीने बांधलेले आढळून आले. पोलिसांनी गायींची सुटका केली. कारवाईत एकूण तीन लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रवीण उदे, पोलीस हवालदार संतोष नागरे, राजाराम डगळे आणि केशव बस्ते यांनी केली.

### मार्गदर्शन शिबिर

**निफाड ।** तेजग्यान फाउंडेशन प्रणित हॅप्पी थॉट्स ग्रुप व न्या.रानडे विद्या प्रसारक मंडळ यांच्या वतीने आनंदी जीवन जगण्याची कला या विषयावर मार्गदर्शन शिबिर (दि.७) वैनतेय विद्यालयात आयोजित करण्यात आले होते.



वि.दा. व्यवहारे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मकरंद पिंपळे, वैशाली दराडे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विश्वस्त रतन वडघुले, अॅड.दिलीप वाघवकर, राजेश सोनी, मधुकर राऊत, विश्वास कराड, तेजग्यान फाउंडेशन प्रणित हॅप्पी थॉट्स ग्रुप मार्गदर्शक मकरंद पिंपळे, सीमा कुलकर्णी, वैशाली दराडे, रवींद्र गिरी, कैलास बच्छाव, संतोष सोनार, वेदांत गायकवाड, वैनतेय विद्यालय प्राचार्य बी.आर. सोनवणे, उपप्राचार्या मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक बी.बी. गुंजाळ, वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे, योगेश्वर विद्यालय प्रभारी मुख्याध्यापक सुनील मोगल आदींसह शिक्षक, शिक्षकेतर सेवक व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

### आरोटें यांचा भाजप प्रवेश

**करंजी खुर्द ।** प्रहार विद्यार्थी संघटना जिल्हाध्यक्ष दत्ता आरोटे यांनी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले व नवनिवार्चित नाशिक उत्तर जिल्हाध्यक्ष यतीन कदम यांच्या उपस्थितीत नाशिक येथे भाजपमध्ये पक्षप्रवेश केला.

भाजप कामगार जिल्हाध्यक्षपदी राहुल आरोटे यांची वर्णी लागली असताना त्यांना शुभेच्छा देण्यासाठी प्रहार संघटना जिल्हाध्यक्ष दत्ता आरोटे हे त्यांच्या भेटीसाठी गेले होते. पक्षांतर्गत किरकोळ वादविवादामुळे आरोटे नाराज असल्याचीही चर्चा होती. अशातच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या तोंडावर दत्ता आरोटे हे भाजपत प्रवेश करणार का? अशी चर्चा आता रंगू लागली होती. याआधी देखील दत्ता आरोटे हे तालुक्यातील भाजप नेते यतीन कदम, माजी ग्रामीण जिल्हाध्यक्ष शंकर वाघ, सतिष मोरे, सारीका डेर्ले, किरण पवार, विनायक खालकर यांच्या संपर्कात होते. अखेर त्यांनी प्रहारला टाटा करत भाजपत सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले, भाजप नाशिक उत्तर जिल्हाध्यक्ष यतीन कदम, भाजप प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, नाशिक शहरप्रमुख सुनिल केदार यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

# महिला सशक्तीकरणासाठी सहकार्य : कराड

**निफाड ।** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी , 'राष्ट्रीय सरपंच संसद' परिषद सहकार्याने नाशिक येथे दोनदिवसीय 'उद्योजक परिषद' आयोजित करण्यात आली होती. त्यात अनुपमा जाधव व विजया मोगल यांना निमंत्रित करण्यात आले होते. उद्योजक परिषदेच्या समारोप सत्रानंतर एमआयटी शिक्षण समूह कार्यकारी अध्यक्ष राहुल कराड यांना द्राक्षबागातदार महिला संघाच्या वतीने 'बेदाणा निर्मिती' उपक्रमाविषयी माहिती देण्यात आली. कराड यांनी या उपक्रमाचे स्वागत करून महिला सशक्तीकरणाचा विधायक उपक्रम यशस्वीतेसाठी 'एमआयटी' पूर्णपणे सहकार्य करेल, असा विश्वास त्यांनी सरपंच परिषदेला दिला.





द्राक्षबागायतदार शेतकऱ्यांच्या घरातील महिलांना पुढे आणण्यासाठी 'राष्ट्रीय सरपंच संसद' परिषद अंतर्गत एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्मेंटअंतर्गत द्राक्षबागायतदार महिला संघाची स्थापना करण्यात आली. या महिला बागायतदार संघाच्या वतीने नुकतीच एमआयटी अध्यक्ष राहुल कराड यांची भेट अनुपमा जाधव व विजया मोगल या महिला पदाधिकाऱ्यांनी भेट घेत बेदाणा उत्पादन उपक्रमाविषयी चर्चा केली. द्राक्षबागायतदार महिला संघाच्या उभारणीत मीना जगताप, शैला मोरे, शारदा मोरे, प्रतिमा मोरे, कल्पना शिंदे, सुरेखा गडाख, शीतल मोरे, मनीषा देशमाने, सुवर्णा ताकाटे, योगिता पवार या द्राक्षबागायतदार महिला पदाधिकाऱ्यांच्या उभारणीसाठी व त्यांना पाठबळ देण्यासाठी राष्ट्रीय सरपंच संसद कार्याध्यक्ष योगेश पाटील, उपाध्यक्ष प्रकाश महाले यांनी परिश्रम घेत हा उपक्रम महाराष्ट्रात यशस्वी करण्यासाठी कराड यांना या उपक्रमाचा मुळ उद्देश द्राक्ष उत्पादकांच्या घरातील स्त्री आत्मनिर्भर होण्यासाठी हा मार्ग निवडला.

# नाशिक मनपा निवडणुकीसाठी चार सदस्यीय प्रभागरचना?

(पान १ वरून) हालचाली सुरू झाल्याचे दिसत आहे. करोनासह ओबीसींचे राजकीय आरक्षण आणि प्रभाग रचनेचा वाद आदी कारणांमुळे राज्यातील २९ महापालिका, २४८ नगरपालिका, २६ जिल्हा परिषदांसह अन्य शेकडो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. सर्व कारभार प्रशासकांच्या हाती आहेत. यामुळे राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांसह नागरिकांमध्ये नाराजी आहे. अखेर सर्वोच्च न्यायालयाकडून येत्या चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिल्याने आता लवकरच निवडणूक होणार आहे. त्यानुसार नवीन प्रभाग रचना करण्यात येणार आहे.

२०१७ मधील चार सदस्यीय प्रभाग रचना पुन्हा कायम ठेवायची की, २०२२ मधील नवीन तीन सदस्यीय प्रभाग रचनेनुसार निवडणूक घ्यायची, याचा निर्णय राज्य सरकार घेणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार नाशिक मनपा चार सदस्यी प्रभाग रचनेनुसार होणार आहे.

## शब्दकोड : २७२



**आडवे शब्द :** १) बारसे, नाव ठेवण्याचा विधी. ४) मत नोंदविण्याचा कागद. ९) हिंदीत नाव. १०) च्या बरोबर. ११) राजमहाल, प्रासाद. १२) लाकूड कापण्याचे हत्यार. १४) शंकर. १६) घरातील खोली (हिं.). १७) प्रयत्न, खटपट. १८) श्री कृष्णाचे घराणे. २०) राजकारभाराचे प्रमुख शहर. २३) नवीन आलेला. २४) दोन नद्यांचे मीलन. २६) पंख. २७) साद्यंत वृत्त, बारीक सारीक तपशीलासह. २९) घट्टच्या विरुद्ध, साडी. ३१) मादीच्या विरुद्ध. ३२) धातूचा धागा. ३३) एक उभयचर प्राणी ३४) राणा प्रतापच्या घोड्याचे नाव. ३५) दहावी रास. ३७) उद्यान (इं.). ३८) पातकी. ३९) योग्य, उचित, पात्र. ४०) मऊ. ४१) सरसकट. ४४) चुलता. ४५) गंध. ४६) एकरुपता. ४८) पती-पत्नी. ५२) जाणे-येणे, वहिवाट. ५४) युद्ध. ५५) पोपट. ५७) प्रफुल्लित. ६०) अवधान, लक्ष, ६१) दंत, रुदन. ६३) डोके, शिर. ६५) ढग, मेघ. ६७) खानेसुमारी. ६८) अधिक महिना. ७०) एक पांढरे फूल. ७१) चिंचेचे कुसकरलेले पाणी. ७२) नटणारा मनुष्य.

**उभे शब्द :** १) अनेक प्रकार. २) माझा. ३) एकत्रित रडणे. ४) चामखीळ. ५) आ-जीवन. ६) वर्तुळाच्या मध्यभागापासून परिघापर्यंत अंतर दाखविणारी सरळ रेषा. ७) हत्तींचा राजा. ८) शिंपण, एकटा. ११) वंदनाचा एक शब्द. १२) चहा पिण्याचे जोड साधन. १३) समशेर. १५) दात. १९) पहिला ऋतू, श्री विष्णू. २१) जोरजोराचा श्वास. २२) रुचीहीन, बेचव. २३) बाजेची कापडी पट्टी. २५) मुस्कटदाबी. २७) सर्वस्व. २८) वेल. २९) ओटा, चबुतरा. ३०) नकला करणारा. ३३) माकड. ३६) भटक बहाद्दर. ३७) पवित्र. ३८) बसण्याची फळी. ३९अ) च्या साठी. ४१) वेळ. ४२) आश्चर्य. ४३) कोशल्य. ४४) कार्य, काज. ४७) सपाट. ४९) वस्त्र. ५०) पोते. ५१) न वापरलेला, नवीन. ५३) थाळी. ५६) मनातील इच्छा ५८) सद्यस्थिती ५९) बिजली, विद्युल्लता. ६०) हिंदुस्थान. ६२) धट्टाकट्टा. ६४) आपले राष्ट्रीय फूल. ६६) धाक, वचक. ६७) तर च्या विरुद्ध. ६९) काचेचा मोठा बाऊल

### शब्दकोड२७१चे उत्तर

